दिनांक २३/०६/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**आ.लो.से. श्री.किशोर बप्पासाहेब आगळे, वय 32 वर्षे, पद- वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक-विजवितरण कं. अंतर्गत ढोरकिन विभाग ता. पैठण जिल्हा औरंगाबाद. यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.4000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.पठैण,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.किशोर बप्पासाहेब आगळे, वय 32 वर्षे, पद- वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक-विजवितरण कं. अंतर्गत ढोरकिन विभाग ता. पैठण जिल्हा औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 4,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या घराजवळ तुटून पडलेली विद्युत तार सुरक्षीत घरापासून लांब बाजुच्या विद्युत पोलवर लावून देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या घराच्या जवळून थ्री फेज विद्युत तारा गेलेल्या आहेत. त्यातील एक तार वाऱ्याने तुटून तक्रारदार यांच्या घराजवळ पडली होती. त्यामुळे विद्युत तार सुरक्षीत घरापासून लांब बाजुच्या पोलवर लावून देण्यासाठी आ.लो.से.किशोर आगळे यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दि. 23/06/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से. आगळे यांनी 5,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 4000/-रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आजच दि. 23/06/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. किशोर आगळे यांनी पंच साक्षीदारासमक्ष तडजोडीअंती ठरलेली लाचेची रक्कम 4000/- रुपये ढोरकिन येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. एम. आय. डी. सी. पठैण,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं/अशोक नागरगोजे, भुषण देसाई, चापोअं. सोमीनाथ थिटे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.